ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख १९ मार्च, १९५८ | अंक ११

## विविध माहिती

**कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री**—भारत व जपान ह्यांच्यांत नुकत्याच करण्यांत आलेल्या व्यापारी करारास अनुसरून मुंबई येथील एका कापडगिरणीनें ८०,००० पौंड किंमतीचीं कांहीं यंत्रें जपानकडून आयात करण्याचा करार केला आहे. यंत्रसामुग्रीचा एक हप्ता चालू महिन्यांत व दुसरा जून महिन्यांत पुरविण्यांत येईल. किंमत मागाहून द्यावयाची आहे.

**शाळेंतील मुलांचें आरोग्य**—मुंबई सरकारनें भारत सरकारला अशी विनंती केली आहे कीं, ग्रामीण भागांतील व शहरांतील शाळांतून शिकणाऱ्या ६ ते ११ वर्षें वयापर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांची आरोग्यविषयक तपासणी करण्यांत यावी. अशी तपासणी करणें राज्यसरकारला आर्थिक दृष्ट्या झेपणार नाहीं असेंहि कळविण्यांत आलें आहे.

**देशी उपचारपद्धतींचा विकास**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत देशी उपचारपद्धतींचा विकास करण्यासाठी १०० लाख रुपयांच्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे. देशी उपचारपद्धतींत मुख्यतः आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी आणि निसर्गोपचार ह्या चार पद्धतींचा समावेश होतो.

**मद्रास कॉर्पोरेशनचा नवा कर**—मद्रास शहरांत येणाऱ्या प्रवाशांवर कर बसविण्याचा अधिकार शहर कॉर्पोरेशनला असावा अशी मागणी राज्य सरकार मध्यवर्ती सरकारकडे करणार आहे. ह्यासाठी रेल्वे ॲक्टमध्यें जरूर ती दुरुस्ती करण्यांत यावी, अशी शिफारसहि राज्यसरकारतर्फे करण्यांत येणार आहे.

**अमेरिकेचा अयशस्वी उपग्रह**—अमेरिकेच्या लष्करी खात्यातर्फे सोडण्यांत आलेला दुसरा उपग्रह पृथ्वीभोंवतीं फिरूं लागण्यापूर्वींच जळून गेला असल्याचें मान्य करण्यांत आलें आहे. उपग्रहाला गति देणारा चौथा स्फोट न झाल्यामुळें त्याला ताशीं १८,००० मैलांची गति मिळूं शकली नाहीं. त्यामुळें तो हवेशीं घर्षण होऊन जळून गेला.

**गुजरातमधील नलिकाकूप**—उत्तर गुजरातमध्यें ४०० नलिकाकूप खोदण्याची योजना आंखण्यांत आली होती. त्यांपैकी ३८४ विहिरी चालू महिनाअखेर पुऱ्या झालेल्या असतील. उरलेल्या लवकरच पूर्ण करण्यांत येतील. विहिरी खोदण्याच्या ह्या योजनेला २·४१ कोटी रुपये खर्च आला असावा.

**कॉलेजमधील कामाच्या दिवसांत वाढ**—येत्या शैक्षणिक वर्षापासून मद्रास विद्यापीठाशीं संलग्न असलेल्या कॉलेजांमधील शिक्षणाचे दिवस १८० करण्यांत यावेत असें सूचनापत्र मद्रास विद्यापीठानें काढलें आहे. सध्यां कॉलेजांमधील शिक्षणाचे दिवस १५० पासून १६५ पर्यंत असतात. शिक्षणाचे दिवस वाढविणें फारसें अवघड जाणार नाहीं असें मत व्यक्त करण्यांत येत आहे.

**कापडावरील अबकारी कर**—राष्ट्रीय ट्रेड युनिअन काँग्रेसच्या गुजरात शाखेनें, कापडावरील अबकारी कराच्या ओझ्यापासून कापडाच्या उद्योगधंद्याला मुक्त करण्याची विनंती मध्यवर्ती सरकारला केली आहे. धंद्याच्या मार्गांतील अडचणी दूर करून उत्पादन व रोजगार ह्यांची पातळी कायम राखण्याच्या आवश्यकतेकडे सरकारचें लक्ष वेधण्यांत आलें आहे.

**वळूची किंमत अधिक पाहिजे**—अनगोळ जातीच्या एका जातिवंत वळूला ३२,००० रुपये देण्याची तयारी एका गिऱ्हाइकानें दाखविली. पण मालकाला ती कमी वाटल्यानें त्यानें वळू विकण्याचें नाकारलें. त्याला निदान ६४,००० रुपये पाहिजे होते. ह्या प्रकारचे वळू भारतामधून परदेशांत निर्यात करण्यांत येतात.

**किंमत रुपयांत घेण्यास तयार**—भारताच्या रेल्वेबोर्डानें पोलंडमधील एका कारखान्याकडून रेल्वेला लागणारी कांहीं सामुग्री घेण्याचें ठरविलें आहे. त्याप्रमाणें कारखान्याकडे मागणीहि नोंदविण्यांत आली आहे. सामुग्रीची कांहीं किंमत रुपयांत घेण्याचें पोलंडनें कबूल केलें आहे. ह्या सौद्यामुळें परदेशीय चलनाची बचत झाली आहे.

**कांहीं स्टेशनेंच चांगलीं असतात**—भारतामधील कांहीं रेल्वेस्टेशनें अशी आहेत कीं तेथून बदली होण्याचा प्रसंग आल्यास तेथील स्टेशनमास्तर नाखूष असतात, अशी माहिती लोकसभेंत रेल्वेमंत्री श्री. जगजीवनराम ह्यांनीं दिली. असें कां म्हणून पृच्छा झाली असतां, 'स्टेशनमास्तरनाच त्याची माहिती' असें उत्तर उपसभापतींनीं दिलें.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## जीवनामधील धकाधकीचे प्रसंग–मार्गदर्शन करणारा निबंधसंग्रह

# तुमचें स्थान कोणतें ?

[ लेखक व प्रकाशक : श्री. श्री. बा. काळे, ८२२ शिवाजी-नगर, पुणें. पृष्ठें १२०, किंमत दोन रुपये. ]

### प्रसंगानुरूप वागण्याची कला

श्री. काळे यांनीं वेळोंवेळीं नियतकालिकांतून प्रसिद्ध केलेल्या लेखांचा हा एक छोटासा संग्रह आहे. धकाधकीच्या आजच्या जीवनांत प्रसंगानुरूप कसें वागावें व जीवनांतील विविध प्रसंगांवर मात करण्यासाठी संसाराचा डाव कसा जपून खेळावा याविषयीं चार शब्द वाचकांना सांगण्याचा श्री. काळे यांचा इरादा आहे.

जीवनांतील कांहीं विशिष्ट प्रसंग निवडून अशा वेळीं आपण कसें वागलों तर त्यामुळें आपलें व आपल्या संबंधित मंडळींचें जीवन कसें सुखावह होईल हें अगदीं व्यवहारी दृष्टिकोनांतून वाचकांना सांगण्याचा प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ, 'सुशिक्षित स्त्रियांचे समृद्ध संसार' या प्रकरणांत ते लिहितात, "पतीला सुधारण्याचा प्रयत्न करणाऱ्या मर्यादा तिनें (स्त्रीनें) वेळींच ओळखणें व कटुता टाळणें हेंच योग्य ठरतें. सुशिक्षित स्त्रियांनीं पति-पत्नीमधील नैसर्गिक संबंध व त्याचे मानसिक व शारीरिक परिणाम विसरून कसे भागेल? वाकवण्यापेक्षा वाकणें हेंच हितकारक ठरतें.'

आजच्या नवभारताच्या काळांत प्रत्येक व्यक्तीला कोणता भाग उचलतां येईल हें त्यांनीं थोडक्यांत फार चांगल्या रीतीनें सांगितलें आहे. 'सरकारनें सर्व कांहीं करावें अशी (आपली) अपेक्षा आहे. परंतु त्यासाठी सरकारचे हात मजबूत करण्यास मात्र आम्हीं तयार होत नाहीं. सरकारकडून कशाची व किती अपेक्षा करावी, यास सुमारच नाहीं." या शब्दांत श्री. काळे यांनीं आजच्या परिस्थितीचें वर्णन केलें आहे व त्यावर उपाय सुचवितांना ते म्हणतात, "माझ्या चार आण्यानं देशाला कितीशी मदत होणार, असा विचार न करतां आणि कोणी किती त्याग केला यावर आपली कृति अवलंबून न ठेवतां आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून योग्य तें (प्रत्येकानें) करावें." श्री. काळे यांचा हा सल्ला आजच्या काळाला निश्चित अनुरूपच ठरेल.

संग्रहांतील सारेच लेख वाचनीय आणि मननीय आहेत. श्री. काळे यांची विचारसरणी कोणाला पटली नाहीं. तरी त्यालाहि त्यांचा दृष्टिकोन समजून घ्यावा लागेल. मुलामुलींनीं आपले विवाह परस्पर संमतीनें ठरवून घ्यावेत असा पुकारा करणाऱ्यांना श्री. काळे यांनीं हा आदेश व्यवहारांत उतरवितांना कोणत्या अडचणी येतात याची सुस्पष्ट कल्पना आपल्या एका लेखांत दिली आहे. तसेच, लष्करी अंमलदाराची पत्नी होण्यांत कोणती व किती जबाबदारी पत्करावी लागते याविषयीं आजच्या महत्त्वाकांक्षी मुलींना त्यांनीं योग्य मार्गदर्शन केलें आहे. थोडक्यांत सांगण्याचें तर हे सारे लेख वाचनीय आहेत. परंतु 'रेडिओ आणि पुस्तकें' या त्यांच्याच लेखांत सांगितल्याप्रमाणें वाचनाची आवड कमी झालेल्या सध्यांच्या काळांत श्री. काळे यांच्या या पुस्तकाकडे किती जणांचें लक्ष जाईल ? खरोखर तें अधिक आस्थेनें वाचलें जावयास हवें. पुस्तकाचे सुरवातीसच लेखकाचें जन्मसाल व ग्रंथालयाच्या सोयीप्रमाणें वर्गीकरण क्रमांक नमूद केलेले आहेत, हेंहि या पुस्तकाचें एक वैशिष्ट्य म्हणूनच उल्लेखावें लागेल.

—सकाळ, २-२-१९५८


बचतीतून राष्ट्रसेवा

बचत करा— समृद्ध व्हा.

तुमच्या समृद्धीवर राष्ट्राची समृद्धी अवलंबून आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक गृह, गिरगांव, मुंबई ४.

शाखा: फोर्ट, दादर, माहिम, वरळी, पुणें, बेळगांव.

स्थापना सन १९२५ टे. नं. २६२५१८

दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९५,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री रा. सा. भ. ना. ढोबळे, (अध्यक्ष)

श्री. गे. गो. ढोले, (उपाध्यक्ष)

श्री. उ. भा. तांबे, (ऑ. मॅ. डायरेक्टर)

श्री. म. बा. बेंडे, (ऑ. खजिनदार)

श्री. म. मा. वामन डायरेक्टर


श्री. गे. ल. पाटील नलवडे ,,

श्री. आ. पां. ढोरे ,,

श्री. झा. मा. मनसुख ,,

श्री. म. रा. नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.



किर्लोस्कर

अिलेक्ट्रिक पंपिंग सेट

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.

आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठी एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकरित्या काम करीत आहेत.

सविस्तर माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. १९ मार्च, १९५८





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## नव्या अर्थमंत्र्याला मिळालेला वारसा

### साठून ठेवलेलीं परदेशी देणीं

रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग खात्यांतील परदेशांमधील शिलकांत २८ फेब्रुवारी, १९५८ अखेर संपलेल्या आठवड्यांत २·४९ कोटी रुपयांची वाढ झाली. इश्यू खात्यांतील विदेशी रोखे, २४५·५४ कोटी रुपयांचे, कायम राहूनहि ही वाढ झाली आहे. परदेशांतील शिलका कमी होत जाण्याची प्रवृत्ति कमी होत चालली आहे, त्याचें हें शुभ निदर्शक आहे. अर्थात्, दर वर्षीच दुसऱ्या सहामाहींत निर्गत व्यापारांत वाढ होते व आयात कमी होते, असा अनुभव आहे. आतां आयातीवर कडक नियंत्रणें आहेत, कांहीं आयात मालाची किंमत कालांतरानें द्यावयाची आहे, कांहीं कर्जें मिळालीं आहेत. ह्या सर्वांचा परिणाम परदेशी शिलकांवरील ताण कमी होण्यांत झाला आहे. अमेरिकेनें २२·५ कोटी डॉलरचें कर्ज देण्याची घोषणा केली आहे व जागतिक बँकेकडून आणखी कर्जें मिळण्याचा बराच संभव आहे. त्यामुळें, कांहीं काळ तरी हायसें वाटेल; कर्जफेडीचे हप्ते सुरू झाले म्हणजे पुनः अडचणी निर्माण होतील.

भारतानें परदेशांकडून घेतलेलीं कर्जें परत फेडण्याची वेळ येईल, त्यावेळीं परराष्ट्रीय हुंडणावळीचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करील; आजचें देणें पुढें ढकलल्यानें प्रश्न सुटणारा नाहीं हें उघड आहे. १९६० ते १९६३ हा काळ कसोटीचा ठरणार आहे; त्या मुदतींत भारताला मोठ्या रकमांची परतफेड करावयाची आहे. १९६१ ते १९६२ ह्या मुदतींत परतफेडीची रक्कम उच्चांक गांठील व पुढें ती हळू हळू कमी होत जाईल. आज भारताला परदेशांतील आपल्या शिलका संपवीत आणण्याची व उधारीनें माल घेण्याची पाळी आलेली आहे; उद्यां शेंकडों कोटी रुपयांची परतफेड करणें हें कांहीं सोपें काम नाहीं. ह्या परतफेडीची योजना सरकारनें आंखलेली नाहीं. अन्नविषयक परिस्थितीवर बरेंचसें अवलंबून राहील; लोखंड–पोलादाची परिस्थितिहि निर्णायक ठरेल. पोलादाचे कारखाने सुरू झाले, म्हणजे आयात थांबेल व परदेशी हुंडणावळीची बचत होईल, इतकेंच नव्हें तर पिग आयर्नची निर्गत परदेशी हुंडणावळ मिळवून देऊं लागेल. १९५८–५९ मध्यें २३ कोटी रु., १९५९–६० मध्यें ३५ कोटी रु., १९६०–६१ मध्यें ९२ कोटी रु., १९६१–६२ मध्यें १२३ कोटी रु., १९६२–६३ मध्यें १०७ कोटी रु. व त्यानंतरच्या वर्षी ४८ कोटी रु. परत फेडावयाचे आहेत. पूर्वी घेतलेल्या कर्जांच्या परतफेडीच्या ह्या रकमा आहेत; ह्यापुढें जीं कर्जें घेतलीं जातील, त्यांची परतफेड त्यांत समाविष्ट नाहीं. कारण, नव्या कर्जांची परतफेड इतक्या लवकर सुरू केलीच जाणार नाहीं. आजची अडचण उद्यावर ढकलून परराष्ट्रीय देण्याचा प्रश्न जसा सुटणार नाहीं, तसेंच उद्यां दुसऱ्या आणखी अडचणी उद्भवणार नाहींत असें गृहीत धरूनहि चालणार नाहीं. एखाद्या आठवड्यांत परदेशांतील शिलकांत थोडीशी वाढ झाली म्हणून कांहींसें समाधान वाटलें तरी त्याची क्षणभंगुरता लक्षांत ठेवली पाहिजे. नवे अर्थमंत्री, श्री. मुरारजी देसाई, हे कणखरपणें हा प्रश्न सोडवतील असा विश्वास आहे. वैयक्तिक अप्रीति सोसूनहि कोणताहि प्रश्न धसाला लावण्याची त्यांची वृत्ति त्यांच्या नव्या जबाबदारीच्या जागीं सत्कारणीं लागो !

---

## शेतीकडे अधिक लक्ष देण्याची जरूरी

भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासंबंधीं उद्योगपति श्री. जी. डी. बिर्ला ह्यांनीं आपले विचार व्यक्त केले आहेत. फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संस्थेच्या वार्षिक अधिवेशनाच्या प्रसंगीं एका मेजवानीच्या वेळीं ते बोलत होते. ते म्हणाले कीं, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या यशाची किल्ली शेताच्या उत्पादनांत आहे. कारण, देशाच्या एकूण उत्पन्नांपैकीं अर्धें उत्पन्न शेतीपासून मिळत आहे. म्हणून शेतीच्या उत्पादनाकडे अधिक लक्ष देणें अगत्याचें आहे. शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी खताची निर्मिती अधिक प्रमाणांत करण्यांत आली पाहिजे व पाणीपुरवठ्याची सोयहि अधिक करण्यांत आली पाहिजे. भारताला दरसाल २० लाख टन खताची आवश्यकता आहे. पण प्रत्यक्ष उत्पादन मात्र सुमारें ५ लाख टनच होतें. भांडवली स्वरूपाचा माल देशांतच उत्पन्न करण्याचे जोरदार प्रयत्न झाले पाहिजेत. परदेशीय हुंडणावळीची चणचण असल्यामुळें हा माल मोकळ्या रीतीनें आयात करणें शक्य होणार नाहीं. परदेशीय हुंडणावळीची चणचण ही कांहीं एक–दोन वर्षेंच भासणारी तात्पुरत्या स्वरूपाची अडचण नाहीं. अजून निदान २५ वर्षें तरी ती चालूच राहील. भांडवली मालाची किंमत मागाहून देण्याचे करार करण्याच्या मार्गालाहि मर्यादा पडतात. म्हणून, ह्या बाबतींत एकच मार्ग उरतो. तो म्हणजे परदेशीय भांडवलाला देशांत येण्यास आवाहन करणें आणि त्याच्या कार्याला उत्तेजन मिळेल असें वातावरण निर्माण करणें.

---

**निराधार स्त्रियांसाठी आसरा**—मुंबई राज्याच्या समाजहित बोर्डातर्फे सुरत येथें निराधार स्त्रियांसाठी एक संस्था स्थापन करण्यांत येणार आहे. निराधार व समाजापासून बहिष्कृत झालेल्या स्त्रियांना संस्थेंत आसरा देण्यांत येईल. त्यांना कांहीं तरी उपयुक्त व्यवसायाचें शिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न करण्यांत येईल.

**मनमाड–भुसावळ रेल्वे–रस्ता**—मनमाड ते भुसावळ ह्या रेल्वे-रस्त्यावर विजेच्या आगगाड्या चालू करण्याचें ठरविलें असल्याची माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. ह्या कामाची तांत्रिक तपासणी चालू वर्षींच सुरू करण्यांत येणार आहे. तीन-चार वर्षांनंतर ह्या मार्गावर विजेच्या आगगाड्या चालू होतील असा अंदाज आहे.

## प्रवाशांवरील कर : उत्पन्नाचें आणखी एक साधन

स्थानिक स्वराज्य-संस्थांना आपल्या हद्दींत सुधारणा करण्याच्या कामीं पैसा अपुरा पडतो ही तक्रार खूप जुनी आहे आणि अजूनहि ती नाहींशी झालेली नाहीं. मद्रास विधानसभेंत भाषण करतांना मद्रासच्या गव्हर्नरांनीं शहरांत येणाऱ्या प्रवाशांवर कर बसवून कॉर्पोरेशनला आपले उत्पन्नांत भर घालतां येईल असें सुचविलें आहे. मध्यवर्ती सरकारनें टर्मिनल टॅक्स ॲक्ट हा १९५६ च्या डिसेंबरमध्यें मंजूर करून घेतला आहे. ह्या कायद्याप्रमाणें केवळ खास प्रसंगासाठीं शहरांत येणाऱ्या प्रवाशांवरच कर बसवितां येतो असें नाहीं. सर्व वर्षभर येणाऱ्या प्रवाशांवरहि तो बसवितां येतो. स्थानिक गरजा भागविण्यासाठीं स्थानिक कर बसविण्याच्या आड राज्यघटना येत नाहीं. कलकत्ता येथें हौरा पुलाचा वापर करणाऱ्याकडून कर घेण्यांत येत असतो. कर किती घ्यावा, माफी कोणत्या परिस्थितींत द्यावी, तो वसूल कसा करावा, ह्यासंबंधीं कायद्यांत व्याख्या देण्यांत आल्या आहेत. जवळून येणारे प्रवासी, लष्करी व पोलिसखातें, आणि तीन वर्षांखालील मुलें, करापासून मुक्त ठेवण्यांत आलीं आहेत. रस्त्यानें येणाऱ्या लोकांकडूनहि हा कर घेतां येईल. म्हणजे एका अर्थानें हा कर यात्राकरासारखाच आहे, असें म्हणतां येईल. यात्रेकरूंना सोई उपलब्ध करून देण्यासाठींच हा कर घेण्यांत येत असतो. मद्रास कॉर्पोरेशनप्रमाणेंच इतर मोठ्या शहरांतील स्थानिक स्वराज्यसंस्था अशा कराचा विचार करूं लागणें शक्य आहे. कारण, शहरांत येणाऱ्या पाहुण्यांना शहरांतील बाजारपेठ, बागा, दिवाबत्ती, इत्यादि सुखसोयींचा फायदा मिळत असतोच.

## प्रत्येक लेजर नोंदीला ९ पेन्स आकार

### स्कॉटिश बँकांचे चार्जेस वाढले

स्कॉटिश बँकांचें वैशिष्ट्य असें आहे, कीं, त्यांचे चार्जेस छापून प्रसिद्ध केलेले असतात. मे, १९५७ मध्यें नोटीस देऊन, १ मार्च, १९५८ पासून ते वाढविण्यांत आले आहेत. १९५२ पासून हे चार्जेस कायम होते, पण व्यवस्था खर्च वाढला आहे, सरकारी सूचनांप्रमाणें कर्जें देण्यांत हात आखडला आहे व ठेवींवरील व्याज वाढलें आहे. चार्जेसमध्यें सुमारें ५०% वाढ करण्यांत आली आहे. ४० नोंदींच्या प्रत्येक लेजर पृष्ठाला ३० शिलिंग, ( प्रत्येक नोंदीला ९ शिलिंग पडतात ) एवढा आकार घेण्यांत येईल; ही नोंद डेबिटची असो वा क्रेडिटची असो. प्रत्येक सहामाहीला किमान १२ शि. ६ पेन्स आकार घेतलाच जाईल. प्रत्येक महिन्यांत, खात्यांतील प्रत्येक किमान दररोजच्या १०० पौंड शिलकेस पूर्वीच्या ६ पेन्स ऐवजीं आतां ९ पेन्स एवढी चार्जेसमधून वजावट केली जाईल. जीं खातीं ठेवणें बँकेला विशेष खर्चाचें असेल ( रोखीचे मोठे व्यवहार, इत्यादि ) त्या खात्यांना जादा दरानें चार्ज सोसावा लागेल. प्रत्येक खातेदाराच्या गरजेप्रमाणें तो बदलेल.

**रुमेनिआची मदतीची तयारी**—भारतांत खनिज तेलाच्या नव्या विहिरी काढण्याच्या कामीं आपल्या अनुभवाचा व ज्ञानाचा फायदा देण्याची तयारी रुमेनिआच्या पंतप्रधानांनीं दाखविली आहे. गोहत्ती येथें तेल शुद्ध करण्याचा एक कारखाना स्थापन करण्यासंबंधीं उभयता सरकारच्या प्रतिनिधींत नुकत्याच वाटाघाटींहि करण्यांत आल्या.

## एंजिनिअरिंगच्या मालाची निर्यात वाढवा

भारताला परदेशीय चलनाची चणचण भासत असल्यामुळें निर्यात वाढविण्याकडे सरकार अधिक लक्ष देऊं लागलें आहे. निरनिराळ्या प्रकारच्या मालाची निर्यात वाढविण्यासाठीं एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलची स्थापना करण्यांत आली आहे. एंजिनिअरिंगचा माल परदेशीं निर्यात करण्यासाठीं असेंच एक कौन्सिल आहे. कौन्सिलचे अध्यक्ष श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांनीं एंजिनिअरिंगच्या मालाची निर्यात वाढविण्याची जरूरी प्रतिपादन केली आहे. दिल्ली येथें पत्रकारांशीं ह्या विषयासंबंधी बोलतांना ते म्हणाले कीं, कौन्सिलनें योजलेल्या उपायांमुळें एंजिनिअरिंगच्या मालाच्या निर्यातींत समाधानकारक प्रगति होत आहे. त्यांतल्या त्यांत डिझेल एंजिन, विजेचे पंखे आणि शिवणाचीं यंत्रें ह्या मालाची निर्यात वाढूं लागली आहे. भारताला जो माल आयात करावा लागतो त्यासाठीं लागणारें परदेशीय चलन मालाची निर्यात करूनच मिळवितां येणें शक्य आहे. निर्यात मालाच्या स्वरूपांत बदल करण्यांत आला पाहिजे. सध्यां भारताकडून जो एंजिनिअरिंगचा माल निर्यात होतो त्यांत कारखानदाराला कांहीं नफा होत नाहीं. म्हणून ह्या कारखानदारांनीं अधिक निर्यात करण्यासाठीं त्यांना उत्तेजन देण्यांत आलें पाहिजे. कारखानदारांना लागणारें पोलाद उत्पादनाच्या किंमतीला देण्यांत यावें व माल निर्यात करून जें परदेशीय चलन मिळेल त्यापैकीं कांहीं भाग परदेशांतून यांत्रिक हत्यारें आयात करण्यासाठीं वापरतां यावा. जपानमधील निर्यात कारखानदारांना अशा प्रकारच्या सवलती देण्यांत येत असतात. त्याचप्रमाणें, निर्यातीच्या प्रमाणांत प्राप्तीवरील करांत सूट देण्याचीहि तरतूद करण्यांत यावी.


महाराष्ट्राची अग्रेसर बँक

दि

# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

—भांडवल—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | १३,५०,००० चे वर |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | ११,५०,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ९,१५,००,००० चे वर |

महाराष्ट्रांत व इतरत्र चाळीस शाखा

सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची सोय पुढील ठिकाणीं केली आहे. तिचा जनतेनें जरूर फायदा घ्यावा.

हेड ऑफिस, डेक्कन जिमखाना ( पुणें ), सोलापूर ( फलटण गल्ली शाखा ), नाशिक, अहमदनगर, श्रीरामपूर, किर्लोस्करवाडी, पनवेल व ठाणें.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात

मुख्य कचेरी
थोरले बाजीराव रस्ता,
पुणें २.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

## भारत सरकारचीं कर्जें

भारत सरकारचीं कर्जें चालू वर्षअखेर ३३५० कोटी रु. असतील व तीं १९५८–५९ अखेर ३९५५ कोटी रुपयांवर जातील. कर्जांत १९३९ च्या मानानें झालेली वाढ खालील तक्ता दर्शवितो.

( आंकडे कोटी रुपयांचे )

| तपशील | ३१-३-१९३९ | ३१-३-१९५८ | ३१-३-१९५९ |
|---|---|---|---|
| भारतांतील कर्जें | | | |
| चालू कर्जें | ४,३७·८७ | १७,०१·२५ | १८,२६·७९ |
| ट्रेझरी बिलें | ४६·३० | १२,१५·७० | १४,२०·७० |
| खास फ्लोटिंग कर्जें | ... | २,०७·८० | २,०४·३७ |
| परतफेडीचीं मुदत झालेलीं कर्जें | ·६५ | १३·९८ | १४·९४ |
| एकूण | ४,८४·८२ | ३१,३८·७३ | ३४,६६·८० |
| स्टर्लिंग कर्जें | ४,६४·९५ | २२·३५ | २१·४७ |
| डॉलर कर्जें | ... | १,५९·८५ | ३,६१·६८ |
| रशियन कर्जें | ... | १५·३० | ४५·९८ |
| जर्मन कर्जें | ... | १४·०० | ४४·०० |
| इतर देशांचीं कर्जें | ... | ... | ·१५·१३ |
| एकूण कर्जें... | ९,४९·७७ | ३३,५०·२३ | ३९,५५·०६ |

वेगवेगळे प्रॉव्हिडंट फंड, पो. ऑ. सेव्हिंग्ज बँक, सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें, रेल्वेजचे घसारा व रिझर्व्ह फंड, इनकम् टॅक्स वगैरेंचीं डिपॉझिटें, इत्यादींच्या रकमा हिशेबांत घेतल्या तर त्याबाबतचीं देणीं १९५७–५८ अखेर १०८८ कोटी रुपये व १९५८–५९ अखेर ११८४ कोटी रु. होतात.

आधीं सांगितलेल्या देण्यांत ती मिळविली पाहिजेत. म्हणजे एकूण कर्जाची रकम खालीलप्रमाणें होते.

| | ३१-३-१९५८ | ३१-३-१९५९ |
|---|---|---|
| नेहेमींचीं कर्जें | ३३,५०·२३ | ३९,५५·०६ |
| इतर देणीं | १०,८७·७१ | ११,८३·९० |
| ब्रिटिश युद्ध कर्ज ( स्थगित ) व रेल्वे वर्षासनें ( ब्रिटिश सरकारकडे डिपॉझिट ठेवलें आहे. ) वजा | –२१·१० | –२०·६२ |
| एकूण... | ४४,१६·८४ | ५१,१८·३४ |

देणें रकमांची छाननी त्यांचा वापर कसा केला गेला किंवा त्यांतून जिंदगी कोणती निर्माण झाली. ह्या दृष्टीनें येथें केली आहे.

| | ३१-३-१९५८ | ३१-३ १९५९ |
|---|---|---|
| रेल्वेज | १२,१६ | १३,५५ |
| पोस्ट–तार, व्यापारी खातीं, दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन सुद्धां | १,६५ | १,८९ |
| व्यापारी उपक्रमांत गुंतवणक | २,७४ | ४,६७ |
| कर्जें | १३,८४ | १६,४४ |
| जागतिक चलननिधि व बँक ह्यांची वर्गणी | २,१३ | २,१३ |
| पाकिस्तानकडून येणें | ३,०० | ३,०० |
| रोख व इतर गुंतवणूक | ५१ | ५१ |
| एकूण... | ३६,५९ | ४२,५० |

## भिलई कारखान्याच्या एंजिनिअर्सचें शिक्षण

मध्यप्रदेशांत भिलई येथें रशिआच्या साह्यानें पोलादाचा कारखाना उभारण्यांत येत आहे. ह्यासंबंधींचा करार उभयता देशांच्या दरम्यान १९५५ च्या फेब्रुआरी महिन्यांत झाला. कारखान्यासाठी लागणारी मुख्य यंत्रसामुग्री विकत घेण्यासाठी रशिआनें भारताला ६० कोटींवर रुपयांचें कर्ज दिलें आहे. कर्जाची फेड १२ वार्षिक हप्त्यांनीं करावयाची असून व्याजाचा दर २॥ टक्के आहे, यंत्रसामुग्रीसाठी सुमारें ६३·१ कोटी रुपये लागतील. त्यांपैकी कांहीं साहित्य भारतांत आलेंहि आहे. आतां रशिआनें कारखाना उभारण्याच्या कामीं आणखी मदत देण्याचें कबूल केलें आहे. मूळ करारांत कारखाना चालविण्यासाठी जे एंजिनिअर्स व तंत्रज्ञ लागतील त्यांच्या शिक्षणाचा खर्च भारतानें सोसावयाचा असें ठरलें होतें. परंतु हाहि खर्च स्वतःच करण्याचें रशिआनें कबूल केलें आहे. भिलई येथील कारखाना उभारण्याच्या कामीं रशिआनें ज्या अटी घातल्या होत्या त्या सैल करून घेण्याचा प्रयत्न करण्यासाठी भारताच्या सरकारची खटपट चालू होती. तिला अशा रीतीनें यश आलें आहे. कारखान्याची यंत्रसामुग्री रशिअन बनावटीची असल्यानें तिचा वापर करणारे लोक रशियानें शिकवून तयार करणें आवश्यकच होतें. त्याप्रमाणें १९५६–५७ व ५८ ह्या सालांत जरूर ते एंजिनिअर्स व तंत्रज्ञ शिकवून तयार करण्याचें मूळ करारांत ठरलें होतें. त्यांचें शिक्षण रशिआंत चालू आहे. एकूण ६८० एंजिनिअर्सना व तंत्रज्ञांना रशिआंत शिक्षण देण्यांत येणार आहे.


## नोटीस

### दि बँक ऑफ कराड लि., कराड

बँकेच्या भागीदारांची बारावी वार्षिक साधारण सभा शुक्रवार ता. २८ मार्च १९५८ रोजीं दुपारीं ४ वाजतां कराड येथें बँकेच्या नव्या इमारतींत भरणार आहे. सदर वेळीं आपण अगत्य येणेचें करावें अशी विनंती आहे.

**सभेपुढील कामें**

( १ ) बँकेच्या ता. ३१–१२–१९५७ अखेर संपलेल्या वर्षाचा ऑडिटर्सनीं तपासलेला ताळेबंद व नफातोटा–पत्रक आणि डायरेक्टर बोर्डाचा रिपोर्ट यांचा विचार करणें व मंजूर करणें;

( २ ) डिव्हिडंड मंजूर करणें;

( ३ ) निवृत्त होणाऱ्या व फेरनिवडणुकीस पात्र असलेल्या डायरेक्टरांच्या जागीं चार डायरेक्टरांची निवडणूक करणें;

( ४ ) ऑडिटर्स नेमणें व त्याचा मुशाहिरा ठरविणें;

( ५ ) अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं कामें.

कराड, ता. १५–२–१९५८ } बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे हुकुमावरून
म. वि. खंडकर,
मॅनेजर.

### व्याज द्यावें लागणारीं कर्जें व देणीं

| | १९३८–३९ | १९५७–५८ दुरुस्त | १९५८–५९ अंदाज |
|---|---|---|---|
| भारतांतील सार्वजनिक कर्जें | ४,३७·८७ | १७,०१·२४ | १८,२६·७९ |
| ट्रेझरी बिलें | ४६·३० | १२,१५·७० | १४,२०·७० |
| | ४,८४·१७ | २९,१६·९५ | ३२,४७·४९ |
| एकूण भारतांतील कर्जें | | | |
| अनफंडेड कर्जें ( सर्व्हिस फंड, सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें, पो. ऑफिस बँकांतील ठेवी, प्रॉ. फंड, इत्यादि ) | २,२५·१३ | ९,०३·९७ | १०,२२·०० |
| घसारा व इतर फंड | २७·३४ | १,६६·६८ | १,३८·०४ |
| इतर ठेवी | ... | १७·०६ | २३·८६ |
| एकूण फंड व ठेवी | २७·३४ | १,८३·७४ | १,९१·९० |
| भारतांतील एकूण देणीं | ७,३६·६४ | ४०,०४·६६ | ४४,३१,३९ |
| इंग्लंडमधील देणीं | ४,६४·९४ | २२·३२ | २१·४४ |
| अमेरिकन कर्जें | ... | १,५९·८५ | ३,६१·६८ |
| रशियन कर्जें | ... | १५·३० | ४५·९८ |
| जर्मन कर्जें | ... | १४·०० | ४४·०० |
| इतर देशांचीं कर्जें | ... | ... | १५·१३ |
| व्याज द्यावीं लागणारीं एकूण कर्जें | १२,०१·५८ | ४२,१६·१३ | ४९,१९·६२ |

### व्याज मिळवून देणारी जिंदगी

| | १९३८–३९ | १९५७–५७ दुरुस्त | १९५८–५९ अंदाज |
|---|---|---|---|
| रेल्वेजना दिलेलें कर्ज | ७,२५·२४ | १२,१५·७० | १३,५४·५४ |
| इतर व्यापारी खात्यांना कर्ज | २७·४२ | १,६४·८८ | १,८६·०८. |
| व्यापारी उपक्रमांत गुंतवणूक | ... | २,७४·३९ | ४,६७·२८ |
| राज्य सरकारांना कर्जें | १,२३·२८ | ११,८५·११ | १४,०२·२१ |
| इतर कर्जें | २०·७१ | १,९९·४० | २,४२·५३ |
| ब्रिटिश सरकारकडे ठेव | ... | ·४८ | .. |
| इतर येणीं | ... | ५५·९१ | ३३·९७ |
| पाकिस्तानकडून येणें | ... | ३,००·०० | ३,००·०० |
| एकूण... | ८,९६·६५ | ३३,९५·८७ | ३९,८६·३१ |
| रोख व रोखे | ३०·३० | ५०·७५ | ५०·७५ |
| ज्यावर व्याज द्यावें लागतें पण ज्यावर व्याज मिळत नाहीं अशा रकमांची बेरीज | २,७४·६३ | ७,६९·५१ | ८,८२·२६ |

**शिक्षकांना अधिक महागाई भत्ता**—आसाममधील प्राथमिक शिक्षकांना दरमहा ५ रुपये प्रमाणें अधिक महागाई भत्ता देण्यांत येणार आहे. सुमारें २०,००० शिक्षकांना ह्या वाढीचा फायदा मिळेल. ह्या निर्णयामुळें राज्य सरकारास दरसाल १२ लाख रुपये अधिक खर्च करावे लागतील.

## अमेरिकेंतील भयसूचक आर्थिक मंदी

गेले कांहीं महिने 'येणार येणार' म्हणून वर्तविली जाणारी आर्थिक मंदी अमेरिकेंत आतां प्रत्यक्ष अवतरल्याची कबुली अधिकृत रीत्या देण्यांत आली आहे. अमेरिकेला शिंक आली म्हणजे जगाला न्यूमोनिआ होण्याचा धोका असतो, अशी एक आर्थिक म्हण प्रचारांत आहे. म्हणून, अर्थशास्त्रांतील तेथील तज्ज्ञ मंडळी फक्त दोनच प्रश्नांचा विचार करूं लागली आहेत. ही मंदी किती दिवस टिकेल व ती कुठवर खोल जाईल ? त्याचप्रमाणें, ह्या मंदीचा बाह्य जगाच्या अर्थव्यवस्थेवर कोणता परिणाम घडेल ह्या विषयाचीहि चर्चा चालू झाली आहे.

अलीकडील काळांत अर्थशास्त्रीय प्रश्नांचा अभ्यास करून ह्या क्षेत्रांतील आगामी घटनांचीं 'भविष्यें' वर्तविण्याबाबत बरीच प्रगति झालेली आहे, असें मानण्यांत येत आहे. तथापि, अर्थशास्त्राचा तात्विक अभ्यास करणारे पंडित अगर प्रत्यक्ष धंदे चालविणारे व्यावहारिक तज्ज्ञ ह्यांनाहि वरील प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें अजूनपर्यंत देतां आलेलीं नाहींत. बहुतेकजण असें म्हणतात कीं, युद्धपूर्वकालांत जशी भयानक परिस्थिति उद्भवली होती, तशी पुन्हां उद्भवणार नाहीं. पण मंदीचा काळ व व्याप्ति ह्यासंबंधीं मात्र निरनिराळे अंदाज करण्यांत येत आहेत. चालू वर्षीं अमेरिका आपल्या संरक्षणव्यवस्थेवर पूर्वींच्या मानानें अधिक खर्च करणार आहे. आर्थिक क्षेत्रावर ह्याचा परिणाम होऊन मंदीची लाट ओसरेल अशी आशा करण्यांत येत आहे. अमेरिकेंतील आर्थिक मंदीचा विपरीत परिणाम अद्याप पश्चिम युरोपांतील देशांवर प्रत्यक्षपणें दिसूं लागलेला नाहीं. तरीपण ब्रिटनमधील बेकारींत वाढ होऊं लागलेली आहे. पश्चिम जर्मनीची अर्थव्यवस्था गेल्या वर्षी चांगली बाळसेदार झाली होती. पण आतां भांडवलाच्या संचयाची गति कमी झाली आहे. कोळसा, पोलाद व कापडगिरण्या ह्यांच्या उत्पादनाला मागणी कमी होऊं लागली आहे आणि गेल्या वर्षाच्या मानानें परदेशांतील मागण्या १२ टक्क्यांनीं कमी झाल्या आहेत. हीं लक्षणें एरव्हींसुद्धां अस्वस्थ करणारीं आहेत. अमेरिकेंतील मंदीच्या पार्श्वभूमीवर तर तीं अधिकच भयसूचक वाटूं लागलीं आहेत. आर्थिक मंदीच्या रोगावर सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ कीन्स ह्यांनीं सुचविलेली उपाययोजना बहुतांशीं मान्य झालेली आहे. करांत कपात करणें, सार्वजनिक मालकीच्या कामावर अधिक खर्च करणें आणि पैसा सुलभ करणें असा त्यांचा तोडगा आहे. खुद्द अमेरिकेंतच, काम करूं शकणाऱ्या लोकांपैकी ७ टक्के लोक बेकार आहेत. त्यामुळें बहुतेक सर्व सरकारें ह्या तोडग्याचा अवलंब करण्यास तयार आहेत. पण हे उपाय केव्हां योजावेत आणि त्यांची तीव्रता किती असावी ह्याबद्दल त्यांना अनिश्चितता वाटत आहे. अर्थव्यवस्थेंत सोडण्यांत आलेली जादा खरेदीशक्ति फार उशिरा व थोडी असली तर तिचा कांहींच परिणाम न होण्याचा संभव आहे. उलटपक्षीं, ती फार असली आणि फार लवकर सोडण्यांत आली तर सध्यां चालू असलेला चलनवृद्धीचा दाब अधिक धोकादायक होण्याचा संभव आहे. शिवाय, ह्या उपायांबाबत अमेरिकेचें मानस अद्याप स्पष्ट झालेलें नाहीं.

ह्या सर्व परिस्थितीचा विचार करून रशिअन राष्ट्रगटाशीं होणाऱ्या व्यापारावरील निर्बंध सैल करण्याचे प्रयत्न अमेरिकेच्या दोस्तराष्ट्रांकडून करण्यांत येत आहेत. त्यांच्या मतानें, पाश्चात्यांचें तंत्रविज्ञान रशिआपासून गुप्त ठेवण्यांत आतां स्वारस्य नाहीं. रशिआच्या उपग्रहानें गुप्तता व्यर्थ असल्याचें सिद्धच केलें आहे.

## पदवीधरांमधील बेकारीच्या स्वरूपाची चिकित्सा

उद्योगविनिमय केंद्रांचे डायरेक्टर श्री. ह्यू डव्हनपोर्ट ह्यांनी पदवीधरांमधील बेकारीच्या स्वरूपाची मोठी उद्बोधक चिकित्सा केली आहे. ती करतांना पदवीधरांच्या पदव्या, त्यांचा खास प्राविण्याचा विषय, त्यांना मिळालेला वर्ग, त्यांचा वयांतील गट, त्यांनीं पूर्वीं केलेली नोकरी आणि नोकरीविषयीं त्यांची पसंति–नापसंति, इतक्या दृष्टींनीं विचार करण्यांत आला. १५ मे, १९५७ ह्या दिवशीं जे पदवीधर उद्योगविनिमय केंद्रांच्या द्वारां नोकरी मिळविण्याचा प्रयत्न करीत होते अशा २६,२९७ पदवीधरांची तपशीलवार माहिती १५१ उद्योगविनिमय केंद्रांकडून गोळा करण्यांत आली होती. त्यापैकीं २५,७८५ पदवीधरांच्या विषयीं जी माहिती आली तिची छाननी करण्यांत आली आणि पदवीधरांमधील बेकारीच्या स्वरूपाविषयीं कांहीं निष्कर्ष काढण्यांत आले. ते पुढीलप्रमाणें आहेत.

(१) पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, मुंबई व दिल्ली राज्यांतून नोकरी मिळविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या पदवीधर बेकारांची संख्या मोठ्या प्रमाणावर आढळून आली. नोंदलेल्या बेकार पदवीधरांत केरळमधील बेकार स्त्री–पदवीधरांचा प्रश्न सर्वांत आधिक गंभीर स्वरूपाचा आढळून आला. (२) केंद्रांत नोंदविल्या गेलेल्या पदवीधरांपैकीं ८४ टक्के पदवीधर आर्ट्स, सायन्स अगर कॉमर्सचे पदवीधर होते. त्याची टक्केवारी अशी: आर्टसचे पदवीधर ४८ टक्के, सायन्सचे पदवीधर २२ टक्के आणि कॉमर्सचे पदवीधर १० टक्के. विद्यापीठांतुन पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या पदवीधरांच्या संख्येच्या दृष्टीनें विचार करतां असें आढळून आलें कीं, बी., ए. बी. कॉम् अगर बी. एससी. ह्या पदव्या धारण करणाऱ्यांपेक्षा बी. कॉम (ऑनर्स) ह्या पदव्या धारण करणारांत बेकारीचें प्रमाण अधिक होतें. (३) आर्टसच्या पदवीधरांपैकीं बऱ्याच पदवीधरांनीं अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र व तत्त्वज्ञान ह्या विषयांत प्राविण्य संपादन केलें होतें. त्याचप्रमाणें सायन्सच्या पदवीधरांपैकीं बरेचजण पदार्थ-विज्ञान, रसायन व गणित ह्या शास्त्रांत प्रवीण होते. (४) बेकार पदवीधरांपैकीं २ टक्के पदवीधर प्रथम वर्गांत उत्तीर्ण झालेले होते, २४ टक्के दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झाले होते व बाकीचे ७२ टक्के तिसऱ्या वर्गांत झालेले होते. प्रथम श्रेणींत आलेल्या आर्टसच्या व सायन्सच्या पदवीधरांतील बेकारींचा विचार करतां त्यांच्यापेक्षा बी. कॉम् झालेल्या पदवीधरांची स्थिति बरी आढळून आली. (५) बेकार पदवीधरांपैकीं ३४ टक्के पदवीधर २५ अगर अधिक वयाचे होते. (६) ७६ टक्के पदवीधरांना पूर्वीं कधींच नोकरी नव्हती. फक्त २३ टक्के पदवीधरांनीं पूर्वीं नोकरी केलेली होती. बी. ए. व बी. कॉम ह्या पदवीधरांना बी. एससी. च्या पदवीधरांपेक्षा अधिक प्रमाणांत पूर्वीं नोकऱ्या मिळालेल्या होत्या.

नोकरीच्या स्वरूपाचा विचार करतांना असें दिसून आलें कीं, ६० टक्के पदवीधरांनीं कारकुनीच्या जागांसाठी, १९ टक्के पदवीधरांनीं धंदेवाईक व तांत्रिक जागांसाठी १५ टक्के पदवीधरांनीं कारभारविषयक जागांसाठी, व ४ टक्के पदवीधरांनीं इतर जागांसाठी नांवें नोंदविलीं होतीं. १५,५८० पदवीधरांनीं कारकुनीच्या जागेसाठी नांवे नोंदविलीं होतीं. त्यापैकीं, १४,८८२ जणांनीं शुद्ध कारकुनी स्वरूपाच्या कामासाठी, ५२२ जणांनीं हिशेबनिस कारकुनीसाठी, १०२ जणांनीं लघुलेखकांच्या जागांसाठी, ६६ जणांनीं टंकलेखकाच्या जागांसाठी व बाकीच्यांनीं इतर जागांसाठी नांवें नोंदविलीं होतीं.

### लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशननें गुंतविलेला पैसा

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशननें १ सप्टेंबर १९५६ पासून या वर्षाच्या फेब्रुआरी अखेरपर्यंत सरकारी रोखे, शेअर्स, लोन, स्टॉक्स इ. मिळून पुढीलप्रमाणें पैसा गुंतविला.

| | नोंदणी बुकांतील किंमत |
|---|---|
| मध्यवर्ती सरकार व राज्य | रु. |
| सरकारांचे रोखे | ४०,०२,६१,४७६ |
| निमसरकारी रोखे | १,७५,४३,५३२ |
| डिबेंचर लोन स्टॉक | १,३५,६७,०३५ |
| प्रेफरन्स शेअर्स | २,९०,८५,३७८ |
| ऑर्डिनरी शेअर्स | १०,८९,७९,५१९ |
| | ५६,९४,३६,९४० |

या कॉर्पोरेशननें फेब्रुआरी, १९५८ अखेरपर्यंत एकूण ४१,७८,०५,००८ रु. सरकारी व निमसरकारी रोख्यांत व १,८३,६३२ रु. सरकारी क्षेत्रांतील कंपन्यांच्या शेअर्समध्यें गुंतविले. याच काळांत खाजगी क्षेत्रांत कॉर्पोरेशननें १५,१४,४८,३०० रु. गुंतविले आहेत.

### पाकिस्तानांतील भारतीय बँका

पाकिस्तानांत २० भारतीय शेड्यूल्ड बँकांच्या व ४ नॉन–शेड्यूल्ड बँकांच्या अनुक्रमें ५१ व ६ कचेऱ्या सध्यां आहेत. नॅशनल बँक ऑफ पाकिस्ताननें रिझर्व्ह बँकेकडे एप्रिल, १९५१ मध्यें मुंबईसुद्धां भारतांत एकूण ३ ठिकाणीं बँकिंगचे व्यवहार सुरू करण्यासाठी परवानगी विचारली होती. त्या बँकेला सुरवातीला एकच ठिकाण यासाठी निवडावें असें कळविण्यांत आल्यावर कलकत्ता येथें आपली शाखा उघडण्यासाठी सदर बँकेनें परवानगी मागितली. तदनुसार सप्टेंबर, १९५१ मध्यें ही परवानगी देण्यांत आली. तेव्हांपासून या बँकेनें दुसऱ्या ठिकाणीं शाखा सुरू करण्यासाठी अर्ज केलेला नाहीं.


## दि सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि., सातारा

# सुवर्ण-महोत्सव

### जाहीर निमंत्रण

स. न. वि. वि.

आपल्या बँकेची स्थापना होऊन पन्नास वर्षे पुरीं होत असल्यानें त्यानिमित्त सुवर्ण महोत्सव समारंभ सातारा येथें शनिवार दिनांक २२ मार्च १९५८ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां श्री. वा. पुं. वर्दे, बी. कॉम. यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा होणार आहे. बँकेच्या सर्व भागीदारांना, खातेदारांना व हितचिंतकांना समारंभाच्या निमंत्रण-पत्रिका रवाना होत आहेतच. तथापि विस्मरणानें पत्रिका मिळाली नाहीं तरी आपलेपणानें सदर समारंभास उपस्थित राहावें अशी विनंती आहे.

समारंभ–स्थळ
"कन्याशाळा" सातारा.

कृ. दि. माजगावकर
चेअरमन

# बँक ऑफ पूना, लिमिटेड

—शेड्यूल्ड बँक—

व्याजाच्या दरांत १% चा फरक म्हणजे १०,००० रुपयांवर १०० रु. होतात. हे शंभर रुपये तुम्हांला आणखी ३ ते ४ रुपये मिळवून देतात.

आमच्या सेव्हिंग्ज बँक ठेवी मागणीसरशीं परत केल्या जातात. पूर्वसूचनेची आवश्यकता नाहीं.

१½% दरानें व्याज दिलें जातें.

बँकेंत तुम्ही तासनतास वायां घालवूं इच्छित नाहीं.

दक्षतेच्या कारभारासाठी आणि तुमच्या गुंतवणुकीवर अधिक व्याज मिळविण्यासाठी बँकेच्या खालील कचेऱ्यांत चौकशी करा :—

(१) ४५५, रविवार पेठ, पुणें २.
(२) ५४, डे. जि. कॉलनी, पुणें ४.
(३) ३६१, सदाशिव पेठ, पुणें २.
(४) वखार भाग, सांगली.



# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.



# दि सांगली बँक लि.

सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. ७,००,००० |
| खेळतें भांडवल अदमासें | रु. २,००,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार खुर्द, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर, मुंबई-फोर्ट व मार्केट यार्ड (सांगली)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.



# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१.

( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ४२,०८,००० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. ६६,००,००० |
| | रु. १,०८,०८,००० |
| गंगाजळी व इतर फंड : | रु. ६०,७६,००० |
| एकूण ठेवी : | रु. ११,००,२६,००० |
| खेळतें भांडवल : | रु. २०,५०,००,००० |

**११ जिल्ह्यांमध्यें ६० शाखा**

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.